**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**गुरुवार दिनांक १८ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते उद्या नागपूरमधील अंबाझरी इथल्या कारखान्यात ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेसची पायाभरणी होणार.**
2. **राज्य विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी शांततेत मतदान; २२ जून रोजी मतमोजणी.**
3. **शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने व्हिप जारी करत बोलवलेल्या बैठकीला सहा खासदार अनुपस्थित.**
4. **गडचिरोलीतील सहा लोहखनिज खाणी, महाराष्ट्र राज्य खनिज महामंडळाकडे वर्ग करण्याची मुख्यमंत्र्यांची केंद्राकडे मागणी.**

--------------------------------------

राजनाथ सिंह

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उद्या नागपूरमधील अंबाझरी इथल्या यंत्र इंडिया लिमिटेडच्या आयुध कारखान्यात दहा हजार टन क्षमतेच्या ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेसची पायाभरणी करतील. ही प्रस्तावित एक्सट्रूजन प्रेस संरक्षण उत्पादन क्षेत्रासाठी एक मोठी राष्ट्रीय संपत्ती ठरेल. ही प्रेस संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठं, उच्च-शक्तीचं आणि अचूक ॲल्युमिनियम मिश्रधातूचं एक्सट्रूजन तयार करण्याची देशाची क्षमता मजबूत करेल. हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ॲल्युमिनियम एक्सट्रूडेड घटकांच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यास आणि आत्मनिर्भर भारत संकल्पनेअंतर्गत स्वदेशी उत्पादनाला पाठिंबा देण्यास मदत करेल.

--------------------------------------

विधानपरिषद मतदान

महाराष्ट्रात विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी आज शांततेत मतदान झालं. यात सोलापूर, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावती, धाराशीव- लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांचा समावेश आहे. नागपूर मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान झालं. ठाणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली-

चंद्रपूर आणि अहिल्यानगर या सहा जागांवर प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे महायुतीच्या उमेदवारांचा मार्ग मोकळा झाला आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठीची मतमोजणी २२ जूनला होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाईल. **अमरावती** मतदारसंघात महानगरपालिकेतल्या काँग्रेसच्या सतरा नगरसेवकांना तटस्थ राहण्याचे आदेश पक्षानं दिले आहेत; मात्र इतर नगरपरिषदांमधल्या नगरसेवकांना असा कोणताही आदेश दिलेला नाही. भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी आपण चांगल्या मताधिक्यानं निवडून येऊ, असा विश्वास व्यक्त केला आहे. दरम्यान, अमरावती मध्ये ५ वाजेपर्यंत ९४.६८ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली. **भंडारा -गोंदिया** मतदारसंघात मतदानासाठी भंडारा जिल्ह्यात दोन आणि गोंदिया जिल्ह्यात दोन अशी एकूण चार मतदान केंद्रं उभारली गेली होती. अविनाश ब्राह्मणकर भाजप, तर नरेश ईश्वरकर अपक्ष हे उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीत सर्वच म्हणजे एकूण ४५७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क् बजावला. या निवडणुकीत महायुतीचा उमेदवार 300 हून अधिक मतांनी निवडून येईल, असा विश्वास महायुतीचे खासदार राजेंद्र जैन यांनी व्यक्त केला आहे. **नागपूर** मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान झालं. ८३६ मतदारांसाठी १४ मतदान केंद्रांची सोय करण्यात आली होती. दरम्यान, राज्यातल्या सर्व जागांवर महायुती मोठ्या मताधिक्यानं विजयी होईल, असा विश्वास भाजपा नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज बातमीदारांशी बोलताना व्यक्त केला.

-------------------------------------

शिवसेना व्हीप

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज व्हीप जारी करत बोलावलेल्या पक्षाच्या बैठकीला सहा खासदार अनुपस्थित होते. या बैठकीला खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे यांच्यासह पक्षाचे एकमेव राज्यसभा खासदार संजय राऊत उपस्थित होते. उर्वरित सहा खासदारांच्या अनुपस्थितीमुळे पक्षाच्या संसदीय गटात फूट पडल्याचं जवळजवळ निश्चित झालं आहे. बैठकीला गैरहजर राहिलेल्या खासदारांमध्ये नागेश आष्टीकर, संजय देशमुख, संजय जाधव, संजय दिना पाटील, ओमप्रकाश राजे निंबाळकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांचा समावेश आहे. या सहाही खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातल्या शिवसेनेत सामील होत असल्याचं पत्र लोकसभा सभापती ओम बिर्ला यांना सादर केलं आहे. मात्र, ही प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसून, पडताळणीसाठी काही खासदारांनी

प्रत्यक्ष उपस्थित राहणं आवश्यक आहे, असं लोकसभा सभापतींच्या कार्यालयाकडून सांगण्यात आल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. दरम्यान, यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांनी पक्ष सोडल्याच्या निषेधार्थ आज वाशिम शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून आंदोलन करण्यात आलं. "जनतेनं शिवसेनेच्या चिन्हावर निवडून दिलेल्या खासदारानं मतदारांचा विश्वासघात केला आहे. यवतमाळ-वाशिमची जनता हे कदापि सहन करणार नाही, असं प्रतिपादन यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुखांनी करत पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींना धडा शिकवण्याचा इशाराही दिला. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

---------------------------------------

रविकांत तुपकर

शेतकऱ्यांच्या शंभर टक्के कर्जमाफीच्या मागणीसाठी बुलढाण्यात क्रांतिकारी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात आंदोलन सुरू असून तुपकर यांची प्रकृती खालावत असल्याचं आमच्या प्रतिनिधीनं सांगितलं आहे. मागील अनेक दिवसांपासून ते अन्नत्याग आंदोलन करत आहेत. जिल्हा प्रशासनाकडून वारंवार अन्नप्राशनाची विनंती करण्यात येत आहे; मात्र सरकारकडून कोणतंही ठोस आश्वासन न मिळाल्यानं तुपकर यांनी आंदोलन मागं घेण्यास नकार दिला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील, तर शंभर टक्के कर्जमाफी हाच एकमेव पर्याय आहे. जीव जाईपर्यंत लढा सुरू राहील, असा दृढ निश्चय तुपकरांनी पत्रकारांशी बोलतांना व्यक्त केला.

---------------------------------------

अन्न सुरक्षा प्राधिकरण

अन्नपदार्थांशी निगडीत सर्व व्यावसायिकांना हाताळणी आणि इतर प्रक्रियेसाठी फक्त सुरक्षित आणि गंजरोधक सुऱ्या, ब्लेड्स तसंच इतर साधनं वापरण्याचे निर्देश FSSAI अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानकं प्राधिकरणानं दिले आहेत. अन्न हाताळणी आणि प्रक्रियेदरम्यान काही व्यावसायिक गंजलेली, खराब झालेली सुरी वापरताना आढळले आहेत.

---------------------------------------

‘जीएसटी भवन’

चंद्रपूर इथल्या अत्याधुनिक वस्तू व सेवा कर भवनाचं लोकार्पण अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते पार पडलं. या सोहळ्याला चंद्रपूरचे पालकमंत्री अशोक उइके, खासदार प्रतिभा धानोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

-------------------------------------

सोन्यावरचं आयातशुल्क

सोन्यावरचं आयातशुल्क वाढवून १५ टक्के केल्यानंतर देशाच्या सोने आयातीत सुमारे ७० टक्के घट होऊन तिचं प्रमाण २५ ते ३० टनांवर आलं आहे. गेल्या १३ मे रोजी सोनं आणि चांदी या धातूंवरचं आयातशुल्क ६ टक्क्यांवरून वाढवून १५ टक्के करण्यात आलं होतं.

-------------------------------------

'ग्रीन स्टील हब' गडचिरोली

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीतील सहा लोहखनिज खाणी महाराष्ट्र राज्य खनिज महामंडळाकडे वर्ग करण्याची मागणी केंद्रीय कोळसा आणि खनिकर्म मंत्री जी.किशन रेड्डी यांच्याकडे केली. या खाणी राज्याला मिळाल्यास २०३० पर्यंत ५ कोटी टन लोहखनिज उत्पादनाचं उद्दिष्ट गाठून महाराष्ट्राला देशाचे 'ग्रीन स्टील हब' बनविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. गडचिरोलीतून सुमारे ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि लाखो रोजगार निर्माण होतील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. टाटा, जेएसडब्ल्यूसह अनेक कंपन्यांनी राज्यासोबत करार केले असून गडचिरोलीला जेएनपीटी आणि वाढवण बंदरांशी जोडणारे रेल्वे आणि मालवाहतूक जाळे विकसित करण्याचं नियोजन करण्यात आलं आहे. या खाणी राज्य महामंडळाकडे दिल्यास त्या पुढील तीन-चार वर्षांत कार्यान्वित करून देशातील पोलाद उत्पादनाला मोठी चालना मिळेल, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

-------------------------------------

बलिदान दिन

झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या बलिदान दिनानिमित्त आज त्यांना अनेक कार्यक्रमांमधून आदरांजली वाहण्यात येत आहे. राणी लक्ष्मीबाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाचं मोठ्या धाडसानं नेतृत्व केलं होतं, असं गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना आदरांजली वाहताना समाजमाध्यमावर म्हटलं आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक नेत्यांनी राणी लक्ष्मीबाई यांच्या बलिदानदिनानिमित्त त्यांना

आदरांजली वाहिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राणी लक्ष्मीबाई यांना अभिवादन केलं आहे.

---------------------------------------

विराग पाचपोर निधन

ज्येष्ठ पत्रकार, लेखक, राष्ट्रीय मुस्लिम मंचाचे ज्येष्ठ पदाधिकारी तथा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक विराग पाचपोर यांच्या निधनाचं वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या निधनानं पत्रकारिता, साहित्य आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. विराग पाचपोर यांचं आज नागपूरमध्ये त्यांच्या निवासस्थानी पहाटे निधन झालं. मृत्युसमयी ते ७४ वर्षांचे होते. १९५२ साली जन्मलेल्या विराग पाचपोर यांनी आयुष्यभर राष्ट्रहित, सामाजिक समरसता आणि वैचारिक प्रबोधन यासाठी कार्य केलं. इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. भारतीय चर्च आणि ख्रिश्चन समाजावरील त्यांच्या अभ्यासपूर्ण ग्रंथांना विशेष मान्यता मिळाली.

---------------------------------------

उपवर्गीकरण मोर्चा

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात 20 जून रोजी नागपुरात मोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. हा मोर्चा दीक्षाभूमी ते जिल्हाधिकारी कार्यालय असा काढण्यात येणार आहे. अनुसूचित जातींच्या घटनात्मक आरक्षणाला धक्का पोहोचविणाऱ्या कोणत्याही प्रयत्नांच्या निषेधार्थ हा मोर्चा आयोजित करण्यात आल्याचं आयोजकांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. अनुसूचित जातींचा समावेश आधीच संविधानाच्या अनुसूचीमध्ये करण्यात आला असून, त्यामध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न हा सामाजिक न्याय तत्त्वांच्या विरोधात आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारनं अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये, तसंच उपवर्गीकरणासंदर्भातील निर्णय तात्काळ मागं घ्यावा, अशी प्रमुख मागणी या मोर्चाद्वारे करण्यात येणार आहे.

---------------------------------------

हवामान

येत्या काही तासात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा या जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसासह वादळाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं

वर्तवली आहे. उद्या नागपूर, गोंदिया, अकोला, अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेचा येलो अलर्ट कायम राहणार आहे; तर वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये वादळ येण्याची शक्यता आहे.

---------------------------------------

एफआयएच

एफआयएच महिला हॉकी स्पर्धेत भारतीय संघानं उरुग्वेवर ३-२ अशी मात केली. न्यूझीलंडमधे सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताचा हा सलग तिसरा विजय असून 'अ' गटात भारत अग्रस्थानी आहे.

---------------------------------------